**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक २१९ वा | शुक्रवार २९ डिसेंबर २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 219 | Date : 29/12/2023 | blow :Friday | Page 4 | Price 4


## १० जानेवारीनंतर राज्यात नवा मुख्यमंत्री

नागपूर : शिवसेना आमदारांच्या अपात्रता याचिकेवरील सुनावणी संपल्यावर आता राजकीय वर्तुळात यासंदर्भात निकालाची प्रतीक्षा आहे. या प्रकरणाचा निकाल १० जानेवारी रोजी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते व काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यात नेतृत्वाबदल होणार असल्याचा दावा केला आहे. वडेट्टीवार माध्यमांशी बोलताना म्हणाले की, १० तारखेच्या निकालानंतर नवीन नवरदेव महाराष्ट्राच्या बोहल्यावर बसेल. मुख्यमंत्रिपदासाठी अनेकजण बाशिंग बांधून बसलेले आहेत. अनेकांनी कपडे शिवून ठेवले आहेत, असेही ते म्हणाले. आम्ही लोकसभा निवडणुकीची तयारी करीत आहोत. जागावाटपासाठी उद्या दिल्लीत महाराष्ट्र राज्याविषयी बैठक आहे. आमच्या पक्षाच्या सर्व्हेत लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात आम्ही ३० पेक्षा अधिक जागा जिंकू शकतो, असे अंदाज आले आहेत. विदर्भातून आम्ही दहापैकी सात जागा जिंकू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



# गरीब ही एकच जात, मग मोदी ओबीसी कसे?

## नागपूरमधील जाहीर सभेत काँग्रेसनेते राहुल गांधी यांचा सवाल

नागपूर : देशातील सर्व समाज घटकांना त्यांचे हक्क मिळावेत म्हणून जातीनिहाय जनगणना करण्याची आमची मागणी आहे. या मागणीमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले व्यक्तव्य बदलले आहे. आधी ते स्वत:ला ओबीसी म्हणवून घेत होते, आता मात्र देशात केवळ गरीब हीच एकमेव जात असल्याचे ते सांगतात. देशात गरीब ही एकच जात असेल तर मोदी ओबीसी कसे, असा सवाल काँग्रेसनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी केला.

काँग्रेस पक्षाच्या १३९व्या स्थापनादिनाच्या निमित्ताने गुरुवारी



नागपुरात दिघोरी नाक्याजवळील मैदानात जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत राहुल गांधी बोलत होते. ते म्हणाले की ओबीसी, दलित, आदिवासींना सत्तेत, प्रशासनात अत्यंत कमी वाटा मिळत आहे. सर्वच क्षेत्रांत या समाज घटकांना कमी स्थान दिले जाते. काँग्रेस पक्षाने जातीनिहाय जनगणना करण्याची मागणी केली. त्यानंतर मोदींची भाषा बदलली आणि आता ते स्वत:ला ओबीसीऐवजी देशात गरीब ही एकच जात असल्याचे सांगत आहेत. केंद्रात काँग्रेस सत्तेत आल्यास जातीनिहाय जनगणना करण्यात येईल, अशी ग्वाही राहुल यांनी दिली.

भाजप सरकारने देशातील कोटयवधी लोकांना गरिबीत लोटले, असा आरोप राहुल यांनी केला. ''आम्हाला अब्जाधीश आणि गरीब असे दोन भारत नको आहेत. देशातील तरुणांना रोजगाराची आवश्यकता आहे. ते मोदी सरकार देऊ शकत नाही. ते काम काँग्रेस पक्षच करेल. सर्वांच्या मदतीने। **पान २ वर**

## पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या अयोध्या दौऱ्यावर

नवी दिल्ली : अयोध्येतील राम मंदिरात रामलल्लाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारीला होणार आहे. या सोहळ्याच्यापूर्वी अयोध्येतील अनेक पुनर्विकसित प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवार, ३० डिसेंबरला अयोध्या दौऱ्यावर जाणार आहेत. यावेळी अयोध्येत २१८० कोटी रुपयांहून अधिक खर्च करून विकसित करण्यात आलेल्या प्रकल्पांचे मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. अयोध्या दौऱ्यादरम्यान नवीन विमानतळ, नवीन पुनर्विकसित रेल्वे स्टेशन, नवीन नागरी रस्ते आणि इतर नागरी पायाभूत सुविधांचा शुभारंभ मोदी यांच्या हस्ते होणार आहे. हे प्रकल्प अयोध्येतील आणि आसपासच्या नागरी सुविधांच्या सुशोभीकरणात आणि सुधारणेस हातभार लावतील, असे पंतप्रधान कार्यालयाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. पुनर्विकसित अयोध्या धाम रेल्वे स्टेशनसह नवीन अमृत भारत ट्रेन आणि वंदे भारत ट्रेनला देखील मोदी हिरवा झेंडा दाखवणार आहेत, असे देखील पंतप्रधान कार्यालयाने नमूद केले आहे.



# जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ चा ७४५ कोटीचा निधी १०० टक्के खर्च झाला पाहिजे : पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील

*** सर्व शासकीय यंत्रणानी मंजूर निधी व्यपगत होणार नाही याची दक्षता घ्यावी *जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ च्या ८५५ कोटीच्या प्रारूप आराखड्यास नियोजन समितीची मान्यता**




सोलापूर/प्रतिनिधीः जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ मध्ये सर्वसाधारण ५९० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १५१ कोटी व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना ४ कोटी २८ लाख निधी असा एकूण ७४५ कोटी २८ लाख इतका निधी मंजूर असून २० डिसेंबर पर्यंत एकूण खर्च झालेला निधी १९० कोटी ११ लाख इतका आहे. हे प्रमाण कमी असून अर्थसंकल्प तरतुदीच्या ३८.७५ टक्के आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी समितीने मंजूर केलेला निधी शंभर टक्के खर्च करावा. हा निधी व्यपगत होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखाची राहील, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी दिले.

नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री पाटील बोलत होते. यावेळी खासदार सर्वश्री जयसिद्धेश्वर स्वामी, रणजितसिंह नाईक-निंबाळकर, ओमप्रकाश राजे निंबाळकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल उगले-तेली, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, सोलापूर शहर पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे, उपजिल्हाधिकारी महसूल विठ्ठल उदमले, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहायक नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील पुढे म्हणाले, की सन २०२३-२४ चा १०० टक्के निधी खर्च झाला पाहिजे यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी प्रयत्न करावेत. ज्या यंत्रणांनी अद्याप प्रशासकीय मान्यतेसाठी आवश्यक असलेली कार्यवाही पूर्ण केलेली नाही त्यांनी ती तात्काळ पूर्ण करून घ्यावी. लवकरच लागणारी आचारसंहिता विचारात घेऊन तातडीने निविदा प्रक्रिया पूर्ण करून निधी मार्च २०२४ पूर्वी खर्च होईल याबाबत काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ मध्ये सर्वसाधारण ५८९ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १५१ कोटी व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना ४ कोटी २८ लाख निधी । **पान २ वर**

## पेट्रोल आणि डिझेल ७ ते ८ रुपयांनी कमी होण्याची शक्यता

मुंबई: समस्त जनसामान्यांसाठी मोठी बातमी आहे. येत्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलचे दर ७ ते ८ रुपयांनी कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबईत पेट्रोल १०६ रुपयांवरून ९८ ते ९९ रुपये प्रति लिटरवर येण्याची चिन्हं आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाल्यामुळे तसेच आगामी लोकसभेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन केंद्र सरकार हा निर्णय घेण्याची शक्यता आहे. यंदाच्या तिमाहीत तिन्ही सरकारी कंपन्यांना मिळून २८ हजार कोटींचा नफा झाला आहे. गेल्या तीन तिमाहींचा विचार केला तर हा नफा एक लाख कोटींच्या घरात आहे. आणखी एक मोठं कारण म्हणजे गेल्या वर्षभरात आंतरराष्ट्रीय बाजारांत तेलाचे दर ७५ डॉलर प्रति बॅरलपेक्षाही कमी झालेत. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे येत्या एप्रिल आणि मेमध्ये लोकसभा निवडणुका आहे. त्या अनुषंगानं देखील केंद्र सरकारनं हा निर्णय घेतल्याचं बोललं जातंय. देशातील पेट्रोल आणि डिझेलच्या किमती गेल्या ५८९ दिवसांपासून स्थिर आहेत. त्यांच्या किमतीतील शेवटचा बदल मे २०२२ मध्ये दिसून आला. आता कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाल्यामुळे देशातील पेट्रोल आणि डिझेलच्या किमती कमी करण्याचा निर्णय केंद्र सरकार घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. ही किंमत ७ ते ८ रुपयांनी कमी होण्याची शक्यता आहे.




## 'जेएन-१' घातक नाही; नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घ्यावी : आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत

मुंबई : राज्यात कोरोनाच्या 'जेएन-१' या नवीन व्हेरियंटचे रुग्ण आढळत असल्याने 'कोरोना टास्क फोर्स'' स्थापन करण्यात आले असून या टास्क फोर्सची पहिली बैठक आज (गुरुवार) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे झाली. कोरोनाचा 'जेएन-१' हा नवीन उपप्रकार घातक नसला तरी नागरिकांनी काळजी घ्यावी. नागरिकांनी घाबरून न जाता कोविड अनुरूप वर्तणुकीचे पालन करावे, असे आवाहन मंत्री प्रा. डॉ. सावंत यांनी केले आहे.

'जेएन-१' या नवीन व्हेरियंटच्या वाढत्या रुग्ण संख्येच्या पार्श्र्वभूमीवर राज्यात पुन्हा 'कोरोना टास्क फोर्स'' स्थापन करण्यात आले आहे. या टास्क फोर्सच्या अध्यक्षपदी भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचे (आयसीएमआर) माजी अध्यक्ष डॉ. रमण गंगाखेडकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आरोग्य मंत्री डॉ. सावंत यांच्या अध्यक्षतेखाली या टास्क फोर्सची बैठक आज झाली.

आरोग्य विभागाचे आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक धीरजकुमार, सर्व जिल्ह्यांचे । **पान २ वर**



## लोकसभा तसचं विधानसभा निवडणुकीत जोमाने काम करू : सिद्रामप्पा पाटील

### भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतले सिद्रामप्पा पाटील यांचे सदिच्छा भेट

अककलकोट/प्रतिनिधीः भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे बुधवारी सोलापूर दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी प्रमुख पदाधिकाऱ्यांशी, बूथ तसचं केंद्र प्रमुख प्रमुखांशी कार्यकर्त्यांशी लोकसभा तसचं विधानसभेच्या आगामी निवडणुकी संदर्भात चर्चा केली. रात्री ९ वाजता त्यांनी भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन आवर्जून भेट घेतली. यावेळी भाजपाचे अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, शहराध्यक्ष नरेंद्र काळे, माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांची उपस्थिती होती. यावेळी स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन संजीवकुमार पाटील यांनी बावनकुळे यांचं शाल तसचं पुष्पगुच्छ देऊन पाटील परिवाराच्या वतीनं स्वागत केल


: दरम्यान यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांनी माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या प्रकृती बाबत आस्थेनं विचारपूस केली. तसचं श्री. स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्यासह येणाऱ्या लोकसभा तसचं विधानसभा निवडणुकी संदर्भात सविस्तर चर्चा केली. स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्या संदर्भात सविस्तर माहिती घेतली. सुमारे दहा ते बारा कोटी रुपये कारखाना चालू करण्यासाठी खर्च करण्यात आले असून, शासनाकडून मदतीची गरज आहे, असं यावेळी सिद्रामप्पा पाटील यांनी सांगितलं. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी ही सिद्रामप्पा पाटील यांनी या साखर कारखान्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

: यावेळी बावनकुळे यांनी स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याला आवर्जून मदत करु, यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी निश्रि्चतचं बोलू अशी ग्वाही देताना आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यावर या संदर्भात पाठपुरावा करण्याची जबाबदारी देऊ, असं देखील ते म्हणाले.

दरम्यान येणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत ताकदीनं उतरुन भाजपाचे उमेदवार निश्रि्चतचं निवडून आणू, मतदार संघात फिरुन राज्य तसचं केंद्र शासनानं लोकहिताची केलेली कामं घराघरापर्यंत पोहोचवू अशी ग्वाही यावेळी माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना दिली. यावेळी बावनकुळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वरील पुस्तक सिद्रामप्पा पाटील यांना भेट दिलं. यावेळी पाटील परिवारातील सदस्यांची उपस्थिती होती.



## बस आणि डंपरचा भीषण अपघात, १२ जणांचा होरपळून मृत्यू



नवी दिल्ली/वृत्तसंस्था : मध्य प्रदेशमधील गुना जिल्ह्यात बुधवारी रात्री भीषण अपघाताची घटना घडली. बस आणि डंपरमध्ये भीषण अपघात झालाय. अपघातानंतर बस पटली झाली अन् आग लागली. यामध्ये १२ जणांचा मृत्यू झाला. तर १४ प्रवाशी जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच उपस्थितांनी तात्काळ घटनास्थळाकडे धाव घेतली. जखमी प्रवाशांना जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेय. सध्या सर्व जखमींची प्रकृती स्थिर असल्याचे समजतेय. स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बस आणि डंपरचा अपघात बुधवारी रात्री नऊ वाजताच्या सुमारास घडली. गुना - आरोन । **पान २ वर**

## संपादकीय

### गालबोट नको..

राममंदिराच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाची निमंत्रणे हा मोठा राजकीय इश्यू बनला आहे. विविध नेत्यांच्या त्या अनुषंगाने रोज नवनवीन प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. त्यामुळे हा मामला वेगळ्याच पातळीवर गेलेला दिसत आहे. मूळ मुद्दा असा आहे की, या कार्यक्रमाची निमंत्रणे देण्याची जबाबदारी नेमकी कोणाची, हाच विषय अजून लोकांना समजलेला नाही. हा सरकारी कार्यक्रम नाही. परंतु, या कार्यक्रमावर भाजपचाच प्रभाव आहे, मग तेच या कार्यक्रमाचे निमंत्रक आहेत काय, हेही अजून स्पष्ट झालेले नाही. पण ज्या लोकांना निमंत्रणे दिली जात आहेत आणि ज्यांना टाळले गेले आहे त्यावर नजर फिरवली तर मात्र, हा भाजपच्या सूचनेनुसारच सुरू असलेला कारभार असल्याचे स्पष्ट दिसत आहे. या कार्यक्रमासाठी ज्यांना निमंत्रणे पाठवली जात आहेत, त्यात अभिनेते, क्रिकेटपटू, ग्लॅमरस संत मंडळी अशा लोकांचा भरणा आहे. विरोधी पक्षांच्या निवडक लोकांनाही निमंत्रणे दिली गेली आहेत. पण यातही राजकारण झालेच आहे, असे स्पष्ट दिसत आहे. बाकी विषय काहीही असला तरी ज्या नेत्यांनी किंवा राजकीय पक्षांनी मंदिरासाठीच्या चळवळीत योगदान दिले आहे त्यांना तरी आवर्जून निमंत्रण द्यायला हवे ही अपेक्षा अवास्तव नाही. अर्थात, एक बाब स्पष्ट आहे की सरसकट सगळ्यांनाच निमंत्रण देणे आयोजकांना शक्य नाही. सुरक्षा आणि अन्य व्यवस्थेचाही प्रश्न असणार आहेच. पण हा कार्यक्रम सर्वसमावेशक असावा अशी अपेक्षा आहे. हा काही एकट्या भाजपचा विषय असू शकत नाही. रामरायाचा भाजपने राजकीय लाभ करून घेतला आहे आणि आता आगामी निवडणूकही राम मंदिर यशाच्या आधारेच लढवण्याचा भाजपचा स्पष्ट इरादा आहे. त्यामुळे निमंत्रणातून ते आपले राजकीय हित जोपासणार असतील तर त्याचीही विपरीत प्रतिक्रिया आल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे हे निमंत्रणाचे वादंग हाताबाहेर जाणार नाही, हेही त्यांना लक्षात घ्यावे लागेल. राम हा सर्वांच्याच आस्थेचा विषय आहे. त्यामुळे या एका धार्मिकदृष्ट्या महत्त्वाच्या कार्यक्रमाचा भलत्याच वादातून विचका होता कामा नये, त्याला राजकीय सुंदोपसुंदीचे गालबोट लागता कामा नये एवढीच अपेक्षा आहे.




अलिबागच्या उत्तरेला पाच - सहा कि.मी. अंतरावर सागरकिनारी थळ हे लहानसे गाव आहे. हा परिसर थळ-वायशेत प्रकल्पामुळे बराच प्रसिद्धीस आलेला आहे. थळच्या सागरात दोन बलदंड सागरी दुर्ग उभे आहेत. खांदेरी आणि उंदेरी अशी त्यांची नावे आहेत. या जल दुर्गांना भेट देण्यासाठी आवर्जून वेळ काढावा लागतो. अलिबाग हे गाव मुंबई - पणजी या महामार्गाला उत्तम प्रकारे जोडलेले असल्यामुळे गाडी मार्गाने पुण्या-मुंबई जाण्यासाठी खाजगी वाहनांचीही सोय होते.

Wi पासून खांदेरी किल्ल्याला जाण्यासाठी होडीची सोय होवू शकते. येथील मच्छीमारी करणार्या होडी या साठी मिळतात. त्यांच्याशी अगोदर संपर्क केल्यास आपली गैरसोय टळू शकते. अन्यथा अव्वाच्या सव्वा आर्थिक भार आपल्यावर पडू शकतो.

थळच्या किनार्यावर पूर्वी थळचा लहानसा किल्ला होता. हा किल्ला खांदेरी व उंदेरी या जल दुर्गावर लक्ष ठेवून असे. आज मात्र या किल्ल्याचे काही अवशेषच शिल्लक राहिले आहेत.

खांदेरी उंदेरीची बेटे ही मुंबई आणि मुरुडाच्या जंजिरा यांच्या मध्ये असल्यामुळे अतिशय महत्त्वाची होती. ही बेटे ताब्यात घेऊन त्यावर जलदुर्ग बांधल्यास मुंबईकर इंग्रज आणि जंजिरेकर सिद्दी यांच्यामध्ये चांगलीच पाचर मारता येईल हे हेरून शिवाजीराजांनी खांदेरीचा किल्ला बांधायला घेतला महाराजांच्या या बेताचा सुगावा लागताच इंग्रजांनी खांदेरी बेटावर आमचा हक्क असल्याचे कारण पुढे करून येथे किल्ला बांधण्याला विरोध केला. इंग्रजांना पोर्तुगिजांकडून मुंबई मिळाली होती. त्याच बरोबर खांदेरी आणि उंदेरी म्हणजे हेन्री आणि केनरी ही बेटेही मिळाल्याचा त्यांचा दावा होता.

महाराजांनी खांदेरी बांधण्याची महत्त्वाची जोखीम मराठी आरमाराचा अधिकारी असलेल्या मायनाक भंडारीवर सोपवली. मायनाक यांनी आपल्या कडव्या साथीदारांच्या साहाय्याने ती जबाबदारी स्वीकारली. एकशे पन्नास सहकारी आणि चार तोफांसहीत मायनाक खांदेरी बेटावर दाखल झाले. इ.स. १६७९ च्या जुलै मध्ये ऐन पावसाळ्यात खांदेरीचे बांधकाम सुरू झाले. इंग्रजांनी आपल्या आरमारासहीत येवून त्यांना आडकाठी करण्याचा प्रयत्न केला. मायनाय यांनी इंग्रजांना न जुमानता काम चालू ठेवले. खांदेरीचे बांधकाम करणारे कामकरी इंग्रजांचा हल्ला परतवून लावण्यासाठी प्रसंगी धारकरी होत. इंग्रजांचा विरोध मोडून काढत मायनाक यांनी खांदेरीचा जलदुर्ग उभा करून स्वराज्यातील जलदुर्गांची मजबुती फळी उभी केली. देरीला जाण्यासाठी होडीतून निघाल्यावर डावीकडे उंदेरीचा जलदुर्ग दिसतो. साधारण तासाभरात आपण खांदेरीला पोहोचतो. खांदेरी बेटावर दोन उंचवटे आहेत. या दोन उंचवट्याच्या बेचक्यांमध्येच धक्का आहे. या धक्क्यावरच आपल्याला उतरावे लागते. खांदेरीच्या या दोन टेकड्या मधली सपाटीची जागा आत घेऊन सभोवताली संपूर्ण तटबंदी बांधण्यात आली आहे. किल्ल्याचा दरवाजा मात्र नष्ट झाला आहे. मधल्या दोन टेकड्यांमुळे गडाचे दोन भागात विभाजन झाले आहे. आपण डावीकडील वाट चालू लागल्यावर आपल्याला एक खडक लागतो. या खडकावर दगड आपटल्यास यातून धातूसारखा नाद करणारा आवाज येतो. येथून जवळच पीराचे ठाणे आहे. याच मार्गाने पुढे गेल्यावर लहान व मोठा मनोरा लागतो. या भागात आग्या वेताहाचे ठाणे आणि पाण्याचे हौद आहेत. खांदेरीच्या तटबंदीवर गाड्यांवर ठेवलेल्या तोफा आहेत. तटबंदीला जागोजाग बुरूज आहेत. तटबंदीचे काम रचीव पद्धतीने केलेले असल्याने दोन चिर्याच्या मध्ये दर्जा भरलेला नाही. तसेच तटबंदीच्या बाहेरील अंगाला मोकळे चिरे टाकून दिले आहेत. त्यामुळे सागराच्या लाटांचा जोर कमी होतो. त्यामुळे मुख्य तटबंदीला कसलीही इजा पोहोचत नाही. भिंतीबाहेरच्या मोकळ्या चिर्यावर नेहमीच सागराचा मारा चालू असतो त्यामुळे या चिर्यावर नेहमीच सागराचा मारा चालू असतो त्यामुळे या चिर्यावर कोरल मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे. पायाला सागराचे खारेपणी लागताच आग होते. त्यामुळे पोहोचू शकत नाही. हे वेगळे तंत्र येथील बांधकामामध्ये पाहायला मिळते.

खांदेरीच्या गडफेरीमधे वेताळ मंदिर, हनुमान मंदिर बुद्ध मंदिर, क्रॉस, पीर अशी अनेक श्रद्धास्थाने पाहायला मिळतात. शिवरायांचे अजोड तंत्र आणि मायनाक भंडारीचे अजोड साहस आपल्याला चकीत करते. मायनाकाला सलाम करूनच आपण परतीच्या वाटेला लागतो.

पान १ वरुन

### गरीब ही एकच जात, मग

महाराष्ट्रात आणि देशात परिवर्तन घडवू,'' असा विश्र्वास राहुल यांनी व्यक्त केला.

देशात विचारधारांची लढाई सुरू आहे. इंडिया आघाडी आणि एनडीएमध्ये अनेक राजकीय पक्ष आहेत. परंतु देशात काँग्रेस आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अशा दोन विचारधारा असून त्यांच्यातील ही लढाई आहे. काँग्रेसने देशाला राज्यघटना दिली. त्यातून सर्वांना समान मताधिकार दिला. मात्र, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सर्व गोष्टींनाच विरोध आहे. संघाने तर अनेक वर्षे आपल्या राष्ट्रध्वजाला वंदनही केले नव्हते, अशी टीका राहुल यांनी केली. देशात श्र्वेतक्रांती महिलांनी केली, तर हरीत क्रांती देशातील शेतकऱ्यांनी केली. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांती युवकांनी केली. काँग्रेसने त्यांना मदत केली, असे नमूद करून राहुल म्हणाले,''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १० वर्षांत किती लोकांना रोजगार दिले? ४० वर्षांत जेवढी बेरोजगारी नव्हती, तेवढी आज निर्माण झाली आहे. देशातील युवकांना रोजगार नसल्यामुळे ते दिवसाचे सात-आठ तास समाजमाध्यमावर असतात. देशातील युवाशक्ती व्यर्थ जात आहे. दुसरीकडे निवडक दोन-तीन उद्योगपतींकडे देशाची संपत्ती सोपवली जात आहे.'' केंद्रात सत्ता आल्यापासून मोदी यांनी सर्व सरकारी यंत्रणांवर कब्जा केला आहे. यातून प्रसार माध्यमे, निवडणूक आयोग, न्यायालयेही सुटली नाहीत, असे टीकास्त्र राहुल यांनी सोडले.

### जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४

तर सर्वसाधारण मध्ये १११ कोटीची अतिरिक्त मागणी प्रस्तावित केलेली आहे. अशा प्रकारे ८५५ कोटी २८ लाखाचा प्रारूप आराखडा राज्य समिती समोर ठेवण्यास जिल्हा नियोजन मान्यता देत असल्याचे पालकमंत्री श्री. पाटील यांनी सांगून अतिरिक्त मागणी केलेला निधीही मोठ्या प्रमाणावर मिळेल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सन २०२४-२५ च्या आराखड्यामध्ये कृषी व संलग्न सेवा ४८ कोटी, ग्रामीण क्षेत्र विकास ४३ कोटी, जलसंधारण विभाग योजना ६१ कोटी, ऊर्जा विकास ४८ कोटी, नगर विकास योजना ९४, कोटी रस्ते व परिवहन ६६ कोटी, पर्यटन तीर्थक्षेत्र संवर्धन व विकास ४१ कोटी या पद्धतीने मागणी करण्यात आलेली आहे. तसेच जिल्ह्याची सामाजिक आर्थिक परिस्थिती आणि नैसर्गिक संसाधनामधील असमानता आणि जलद गतीने वाढणाऱ्या शहरीकरणाच्या आव्हानांना सामोरे जाण्याची गरज या बाबी विचारात घेऊन सोलापूर जिल्ह्याचा जिल्हा विकास आराखडा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे, असेही श्री. पाटील यांनी सांगितले.लोकप्रतिनिधींनी शिक्षण, आरोग्य व राज्य वीज वितरण कंपनीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील मांडलेल्या विविध समस्यांच्या अनुषंगाने या सर्व विभागाच्या पुढील आठवड्यात स्वतंत्र बैठका आयोजित करून त्याची सविस्तर माहिती घेण्यात येईल. तसेच संबंधित विभाग प्रमुखांनी यावर अधिक लक्ष घालून सर्व यंत्रणा सुरळीत होईल यासाठी प्रयत्न करावेत असे निर्देश पालकमंत्री श्री. पाटील यांनी दिले. तसेच जिल्ह्याच्या टंचाईच्या अनुषंगाने कालवा समितीची पुढील दोन दिवसात बैठक घेऊन माहे जुलै २०२४ अखेरपर्यंत पाणी पुरेल या दृष्टीने नियोजन करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील महा-ई-सेवा केंद्र पुढील आठवड्यात सुरू करण्यात येतील. तसेच होटगी येथील विमानतळ सुरू करण्याच्या दृष्टीने तेथील कामे सुरू झालेले असून रनवे व प्रशासकीय इमारतीचे तसेच संरक्षक भिंतीची कामे जून ते ऑगस्ट अखेरपर्यंत पूर्ण होतील व त्यानंतर विमानतळ प्राधिकरण यांच्याकडून विमान सेवा सुरू करण्याबाबत पुढील कार्यवाही होईल अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. त्याप्रमाणे जिल्ह्यातील ज्या ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवक शासकीय कामकाजात दिरंगाई अथवा टाळाटाळ करत असतील त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी व गटविकास अधिकारी यांची स्वतंत्र बैठक घेऊन ग्रामसेवकांना शासकीय कामे तातडीने करण्याबाबत निर्देशित करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.तर महापालिका आयुक्त शितल उगले तेली यांनी सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या दुहेरी पाईपलाईनच्या कामकाजाविषयी माहिती दिली. हे काम निविदा प्रक्रियेनुसार नोव्हेंबर २०२४ आखेर पर्यंत पूर्ण अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार सर्वश्री रणजितसिंह मोहिते पाटील, सुभाष देशमुख, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, राम सातपुते, संजय शिंदे, यशवंत माने, माजी आमदार व समिती सदस्य प्रशांत परिचारक, दीपक साळुंखे आदी उपस्थित होते. यावेळी लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा व त्यांचा मतदार संघातील विकासाच्या दृष्टीने खालील विषय, समस्या व निधीची मागणी केली.

जन सुविधा योजनेच्या निधीत वाढ करावी, तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधीत वाढ करावी, मंद्रूप येथील मंजूर असलेल्या ट्रॉमा केअर सेंटरसाठी जागा उपलब्ध करून द्यावी, जुळे सोलापूर येथे नाट्यगृह सुरू करावे, समशानभूमीसाठी जागा उपलब्ध करावी, अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती पिकांचे नुकसान भरपाई मिळावी, जिल्हा सामान्य रुग्णालयाला सिटीस्कॅन व एम आर आय मशीन तात्काळ उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्जातील अडचणी सोडवाव्यात, ग्रामसेवकावर योग्य नियंत्रण ठेवावे, प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थिती सुधारावी, शिक्षकांची रिक्त पदे भरावेत, पिक विम्याच्या आग्रिममधून वगळलेल्या मंडळांना पीक विम्याची रक्कम मिळावी, पाणंद रस्ते साठी निधी मिळावा, धर्मादाय रुग्णालयात आरक्षित बेडबाबतची माहिती दर्शनी भागात लावावी, महा ई सेवा केंद्र लवकर सुरू करावीत, होटगी येथील विमानतळ सेवा लवकर सुरू करावी, सोलापूर शहराला नियमित व सुरळीत पाणीपुरवठा व्हावा, जिल्ह्यात टंचाईची परिस्थिती असल्याने टंचाईच्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी आदी मागण्या लोकप्रतिनिधी व अशासकीय सदस्यांनी मांडल्या व त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ चा २० डिसेंबर २०२३ अखेर झालेल्या खर्च तर सन २०२४-२५ चा प्रारूप आराखडयाची माहिती बैठकीत सादर केली. सहायक जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांनी आभार मानले.

### 'जेएन-१' घातक नाही; नागरिकांनी

जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिकांचे आयुक्त, जिल्हा आरोग्य अधिकारी, महानगरपालिका आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, तसेच टास्क फोर्सचे सदस्य, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधुरी कानिटकर, वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. राजेश कार्यकर्ते, पुण्याच्या राष्ट्रीय विषाणू संस्थेतील (एनआयव्ही) डॉ. वर्षा पोतदार, नवले वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. डी. बी. कदम, आरोग्य विभागाचे सर्व प्रमुख अधिकारी या बैठकीला दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीला आरोग्य सेवा अतिरिक्त संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांनी राज्यातील कोरोनाची सद्य:स्थिती आणि आरोग्य विभागाच्या तयारी संदर्भात सादरीकरण केले.

'जेएन-१' साठी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाची यंत्रणा सज्ज असली तरी आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी सर्व तयारीनिशी सतर्क राहण्याच्या सूचना मंत्री डॉ. सावंत यांनी दिल्या. तसेच ज्या प्राथमिक आरोग्य केंद्र, शासकीय रुग्णालयांमध्ये रंगीत तालीम झालेली नाही तेथे ती करून घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले. संशयित रुग्णांच्या चाचण्या वाढवाव्या, त्यांचे सर्वेक्षण अधिक सक्षम करण्याचे आणि त्यांच्यावर आवश्यक ते उपचार करावेत. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. अशा वेळी लोक पर्यटनस्थळे, धार्मिक स्थळी जातात. मात्र, नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी कोविड अनुरूप नियमांचे पालन करणे आणि काळजी घेणे आवश्यक आहे. जोखमीच्या रुग्णांनी अशा गर्दीच्या ठिकाणी जाऊ नये, असे आवाहनही मंत्री प्रा. डॉ. सावंत यांनी केले आहे. नवीन वर्षाच्या स्वागतानंतर लोक परत आपापल्या घरी येतील, त्यामुळे या विषाणूचा संसर्ग वाढण्याचा धोका अधिक आहे, त्यामुळे पुढील १० ते १५ दिवस आरोग्य यंत्रणेने आणि नागरिकांनी सतर्क रहावे. टास्क फोर्सकडून आवश्यकतेनुसार मार्गदर्शक उपाययोजना सुचविल्या जातील, असेही त्यांनी सांगितले.

टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. गंगाखेडकर यांनी सांगितले, जेएन-१ या कोरोनाच्या उपप्रकारामुळे मोठा धोका निर्माण होईल, अशी परिस्थिती सध्या नाही. मात्र, तरीही वयोवृद्ध नागरिक आणि गंभीर आजाराच्या रुग्णांनी काळजी घेण्याची आवश्यकता आहे. आरोग्य यंत्रणा सज्ज असून लोकांनी घाबरून न जाता काळजी घ्यावी. उपचारामध्ये एकसमानता राखण्यासाठी औषध नियमावली तसेच आवश्यक ती मार्गदर्शक नियमावली लवकरच टास्क फोर्सकडून सादर केली जाईल. लेफ्टनंट जनरल (निवृत्त) डॉ. कानिटकर, डॉ. कार्यकर्ते, डॉ. पोतदार, डॉ. कदम यांनी विविध सूचना केल्या.

### बस आणि डंपरचा भीषण..


महामार्गावर हा भीषण अपघात झाला. डंपर महामार्गावर उलट्या दिशेने येत होता.. त्यावेळी डंपने प्रवाशी बसला जोरदार धक्का दिला. डंपरची धडक बसल्यामुळे बस पलटी झाली. त्यानंतर बसला भीषण आग लागली. या आगीमध्ये १४ जणांचा होरपळून मृत्यू झालाय. गुना येथे झालेल्या भीषण अपघातावर मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी दु:ख व्यक्त केलेय.

त्याशिवाय आर्थिक मदतीची घोषणाही केली. मुख्यमंत्री मोहन यादव यांनी एक्स (ट्विटर) वर म्हटलेय, गुनावरुन आरोनला जाणाऱ्या बसमध्ये भीषण आग लागल्यामुळे प्रवाशांचा मृत्यू झाल्याचं समजलं, हे वृत्त वाचून दु:ख झालेय. या हृदय विदारक अपघातामध्ये मृत्यू झालेल्या नागरिकांच्या कुटुंबियांच्या दुखा:त सहभागी आहे.

## मतदारसंघातील प्रलंबित कामे तात्काळ मार्गी लावण्यासाठी आ. आवताडे जिल्हा नियोजनच्या बैठकीत आक्रमक

### पालकमंत्र्यांकडून कामे तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना

मंगळवेढा/प्रतिनिधी : नैसर्गिक दुष्काळ, नापिकी, अवकाळी पाऊस, विविध रोगांचा व कीटकांचा प्रादुर्भाव यामुळे नासाडी झालेल्या पिकांचे पंचनामे होऊन अनेक महिन्यांचा कालावधी उलटल्यानंतरही शेतकरी पीकविमा व शासकीय मदतीपासून वंचित आहेत,अथक प्रयत्नांतून सुरु केलेली मंगळवेढा तालुक्यातील ४० गावची भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुरु झाल्यानंतर गावांना पिण्याचे पाणी मिळत आहे, परंतु या योजनेसाठी वापरण्यात आलेल्या विजेचे एक ते सव्वा कोटी रुपये वीज बिल प्रलंबित होते त्यापैकी १० ते १५ लाख रुपये बिलाची रक्कम भरण्यात आलेली आहे. उरलेली बिल टंचाई मधून भरून ही योजना अखंडपणे सुरू ठेवा जर ही योजना विज बिलाअभावी बंद पडली तर तालुक्याच्या दक्षिण भागातील ४० ते ५० गावांमध्ये टँकर सुरू करावे लागणार आहेत आणि हा खर्च पुन्हा प्रशासनाला परवडणारा नसून मुबलक पाणीही मिळणार नाही त्यामुळे जिल्हा परिषद टंचाई अंतर्गत आवश्यक निधीची तरतूद करून वीज बिलाचा प्रश्न्न मार्गी लावा,त्याचबरोबर



पंढरपूर- मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत परंतु या केंद्रामध्ये आवश्यक वैद्यकीय स्टाफ तसेच औषध तुटवडा असल्यामुळे ही केंद्रे असून अडचण नसून खोळांबा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे त्या आरोग्यकेंद्राना औषध पुरवठा व स्टाफ भरती करा अशी आक्रमक मागणी करत आ समाधान आवताडे यांनी मतदार संघातील समस्या पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्यासमोर मांडल्या.

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्हा नियोजन समितीची बैठक

**पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघांमध्ये जवळपास दोन लाखाहुन अधिम पशुधन आहे परंतु अलीकडच्या काही दिवसांमध्ये वाढलेल्या थंडीमुळे जनावरांना लाळ खुरकुत या रोगाची साथ सुरु आहे. सोलापूर जिल्ह्याबाहेर सदर रोगावरील लसीकरण सुरु आहे मात्र आपल्या जिल्ह्यात विशेषतः पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघात या रोगामुळे अनेक जनावरे आजारी पडत आहेत परंतु त्यावर मुबलक प्रमाणात लसीकरण उपलब्ध नसून लसीकरणाचा आवश्यक पुरवठा उपलब्ध करण्याची मागणी ही आ आवताडे यांनी पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्यासमोर केली.**

गुरुवारी घेण्यात आली. जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ चा प्रारूप आराखडा सदर बैठकीमध्ये तयार करण्यात आला आहे.

या बैठकीत बोलताना आ. समाधान आवताडे म्हणाले की सर्वसामान्यांच्या विकासाच्या अनेक सोयी- सुविधा मार्गी लागण्यासाठी जनसुविधा या हेडला अधिक निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे जिल्ह्यातील रस्ते तसेच महावितरणला निधी वाढविण्यासाठी पंढरपूर- मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आ. समाधान आवताडे यांनी आग्रही भूमिका मांडली आहे.

मतदार संघातील दळणवळण व्यवस्था सक्षम होऊन नागरिकांना दैनंदिन रहदारीसाठी व प्रवासासाठी चांगल्या स्थितीतील रस्ते बांधणीसाठी व रस्त्याच्या दुरुस्ती आणि सुधारणा साठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य महावितरण विभागांतर्गत वीज पुरवठा सुरळीतपणे सुरू ठेवण्यासाठी नवीन डी.पी बसविणे व वाढीव डी.पी ची मागणी पूर्ण करण्यासाठी या विभागाला निधीची तरतूद करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# ग्राहकांनी सतर्क राहून वस्तू खरेदी करावेत: तहसीलदार सचिन मुळीक



पंढरपूर/प्रतिनिधी : ऑनलाइन शॉपिंगचा पर्याय ग्राहकाकडे असल्याने नामांकित ब्रँडस एका क्लिक सरशी ग्राहकांना घरपोच मिळू लागल्या आहेत

शासनाच्या या वाढत्या स्पर्धेमुळे आज ग्राहक हा खऱ्या अर्थाने फसवणूक होऊ नये असे प्रतिपादन मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक यांनी व्यक्त केले मोहोळ तहसील कार्यालय येथे राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त मोहोळ तहसील कार्यालय करण्यात आले होते याप्रसंगी ते अध्यक्ष स्थानावरून बोलत होते याप्रसंगी तालुका पुरवठा निरीक्षक महालिंग लोंढे बाळासाहेब देशमुख नानासाहेब वाघमोडे कांतीलाल राऊत राहुल तावस्कर अमोल महामुनी संतोष मस्के नितीन देशमुख नागेश माळी देविदास शेंडगे संदीप सोनवणे मनोज पुराणे जगदीश कोळी पोलीस हेडकॉन्स्टेबल आरती देशमुख नागरे अधिक प्रमुख मान्यवर महाराष्ट्र राज्य गीत गायन करून ग्राहक गीत सादर करून मंत्रमुग्ध केले कार्यक्रमाची प्रस्तावना वनिता सुरवसे यांनी केली तहसीलदार मुळीक पुढे बोलताना म्हणाली की बाजारातील वाढत्या प्रभावामुळे ग्राहकांना मोठ्या प्रमाणात फायदा होत असला तरी फसवणूक होत आहे असे त्यांनी म्हटले आहे

# अभूतपूर्व गर्दी, शिव महापुराण कथा सोहळ्याने आषाढीची आठवण

## शिव महापुराण कथा सोहळ्यात केल्या पोळ्या,खरकटे काढले..भाविकांच्या सेवेत अभिजीत पाटील तल्लीन झाले!



पंढरपूर/प्रतिनिधीः चंद्रभागा मैदान पंढरपूर येथे श्री हरिहर शिव महापुराण कथा सोहळ्याचा चौथा दिवस अलोट गर्दी आणि भाविकांच्या प्रचंड उत्साहात संपन्न झाला.. सुप्रसिद्ध पंडित पूजनीय श्री.प्रदीप मिश्रा महाराज यांच्या सुमधुर वाणीतून शिवमहापुराणाच्या माध्यमातून असंख्य भाविकांना जगण्याचे ज्ञान आणि भक्तीचा भाव मिळत आहे..कथेची लोकप्रियता दिवसागणिक वाढती असून भाविकांची संख्या आजही वाढती राहिली.. यजमान श्री.अभिजीत पाटील यांनी केलेली भाविकांची सेवा, व्यवस्थापन आणि चोख आयोजनामुळे एवढी संख्या असूनही भाविकांना कथेचा आनंद घेता येतो आहे..

परंपरेप्रमाणे सकाळी आरती व पूजनाने कथेची सुरुवात करण्यात आली. पंढरपूर येथील माजी व आजी नगरसेवकांच्या हस्ते पूजन व आरती करण्यात आली. यावेळी शिवसेवा आणि जनसेवेचा एक अनोखा संगम पाहायला मिळाला..भाविकांची सेवा करताना महाप्रसादाच्या स्वयंपाकापासून, वाढप व्यवस्था, मैदानाची सफाई, शिव स्वरूप धारण करण्याची जबाबदारी व भाविकांची आस्थेने विचारपूस या सर्वच कार्यात यजमान श्री.अभिजीत धनंजय पाटील यांचा अत्यंत उत्साहवर्धक आणि सक्रिय सहभाग सर्वांसाठीच प्रेरणादायी ठरला..

दिनांक ३१ डिसेंबर पर्यंत या कथेचे आयोजन केले असून पंढरपूर व पंचक्रोशीतील भाविकांनी या कथेचा अधिकाधिक संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे

# विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम; दावे व हरकती निकाली काढण्यासाठी मुदतवाढ

सोलापूर/प्रतिनिधीः राज्य निवडणूक आयोगाने १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम निर्धारीत केला आहे. कार्यक्रमानुसार निवडणूक आयोगाने निर्धारीत दावे व हरकती निकाली काढण्यासाठी शुक्रवार दि. १२ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अशी माहिती उपजिल्हा निडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिली आहे.सुधारित वेळापत्रक:- दावे व हरकती शुक्रवार दिनांक १२ जानेवारी २०२४ पर्यंत निकाली काढणे, बुधवार दिनांक १७ जानेवारी २०२४ पर्यंत मतदार यादीची तपासणी आणि अंतिम प्रसिध्दीसाठी आयोगाची परवानगी घेणे व डाटाबेस अद्यावत करणे आणि पुरवणी याद्यांची छपाई करणे. तर अंतिम मतदार यादी प्रसिध्दी सोमवार दि. २२ जानेवारी २०२४ रोजी करण्यात येईल.

# गुरव ,विरशैव लिंगायत समाजाच्या आर्थिक विकासासाठी कार्यालय कार्यान्वित

सोलापूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत गुरव समाजाच्या सर्वांगीण व आर्थिक विकासासाठी संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ आणि विरशैव लिंगायत समाजाच्या आर्थिक विकासासाठी जगदज्योती महात्मा बसवेश्र्वर आर्थिक विकास महामंडळाची शासनाने स्थापना केली असून, सोलापूर जिल्हा स्तरावरील कामकाज कार्यान्वित करण्यात आले आहे. शासनाने राज्यातील गुरव व विरशैव लिंगायत समाजातील जास्ती-जास्त गरजू व पात्र व्यक्तींना शासमान्य योजनांचा लाभ व्हावा या हेतूने

कार्यालय कार्यान्वित केली आहेत. अधिक माहितीसाठी जिल्ह्यातील गुरव व विरशैव लिंगायत समाजातील समाजातील गरजू, पात्र व्यक्तींना महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सात रस्ता, सोलापूर, दुरध्वनी क्रं.०२१७-२३१२५९५ येथे संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

# जिल्हा क्रिकेट संघटनेच्या उपाध्यक्षपदी श्रीकांत मोरे

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेच्या उपाध्यक्षपदी मनोरमा परिवाराचे मार्गदर्शक श्रीकांत मोरे यांची निवड करण्यात आली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष आमदार रणजीतसिंह मोहिते- पाटील, अध्यक्ष माजी आमदार दिलीप माने, संयुक्त सचिव धैर्यशील मोहिते-पाटील, उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, सचिव चंद्रकांत रेंम्बर्स, के. टी. पवार, उमेश मामड्याल, खजिनदार संतोष बडवे, आदी पदाधिकारी उपस्थित होते. मिहाराष्ट्र विरूद्ध मणिपूर हा रणजी ट्रॉफी क्रिकेट सामना दि. ५ ते ८ जानेवारी २०२४ दरम्यान सोलापूर येथील इंदिरा गांधी स्टेडियम (पार्क मैदान) येथे होणार असल्याची घोषणा धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केली.

# ८० ऐवजी ७० टक्के शिक्षक भरती पदांची जाहिरात येणार..!

## शिक्षक भरतीत पुन्हा खोड उमेदवारामध्ये तीव्र नाराजी..

सोलापूर/प्रतिनिधीः शिक्षक भरती संदर्भात शिक्षण आयुक्तांनी काही दिवसापूर्वी पवित्र पोर्टलवर रिक्त पदांच्या जाहिराती प्रसिद्ध कराव्यात अशी सूचना महाराष्ट्रातील सर्व झेडपीच्या सीईओ यांना केली होती.मात्र विधिमंडळाच्या नागपूर अधिवेशनात शिक्षक भरती संदर्भात बिंदूनामावलीतील दुरुस्तीबाबत आमदारांनी प्रश्र्न उपस्थित केले गेले होते त्या संदर्भात कारवाई करणे आवश्यक आहे.

आत्ता पवित्र पोर्टलवर जाहिरात देताना ८० टक्के ऐवजी ७० टक्के रिक्त पदांची मागणी करावी अशी नव्याने सूचना दिनांक १९ रोजी शिक्षण आयुक्तांनी सर्व जिल्हा परिषदच्या सीईओ ना केले आहे. त्यामुळे यापूर्वीच अनेक महिन्यापासून रखडलेल्या शिक्षक भरती मध्ये आता पुन्हा १० टक्के जागा कमी भरल्या जाणार असल्याने या निर्णयाविरोधात महाराष्ट्र मधील लाखो उमेदवार मध्ये नाराजी चा सूर दिसून येत आहे.

जून २०२३ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार शिक्षकांच्या रिक्त पदाच्या ८० टक्के पद भरण्यास दिलेली परवानगीनुसार सर्व पदे भरवायची आहेत मात्र बिंदूनामाली संदर्भात काही वैध,आक्षेप किंवा तक्रारी प्राप्त असल्यास त्यांचे निराकरण केले जाईल आणि शासनाच्या परवानगीनुसार उर्वरित १० टक्के रिक्त पदे भरतीच्या कारवाई करण्यात यावी असेही आयुक्तांनी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे शिक्षक भरती प्रक्रियेत बिंदूनामावली तपासण्याची कारवाई सुरू होण्यापूर्वी लोकप्रतिनिधी, ,संघटना ,उमेदवार यांच्याकडून विविध स्तरावर बिंदू नामावली अचूक करण्याबाबत त्रुटी दूर करण्याबाबत निवेदने मिळाली होती.शिक्षकांचे सेवाविषयक अभिलेख पडताळून बिंदूनामावली अद्यावत करण्याची कारवाई केली गेलेली आहे.

सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे बिंदूनामावली लवकरात लवकर पूर्ण करून संवर्ग व प्रवर्ग यादी जाहीर करण्यात यावी.रिक्त जागेच्या संदर्भात सुद्धा माहिती द्यावी.

### स्पर्धा परीक्षा समन्वय समिती शिक्षक भरती संघटना

\- ८० टक्के पद भरती संदर्भात वित्त विभागाने सकारात्मक निर्णय दिल्या असताना सुद्धा शिक्षकांची सर्व पदे तातडीने भरण्याबाबत शासन सकारात्मक दिसत नाही.आणि त्यामध्येच १० टक्के पदे कमी भरले जाणार आहेत.यामुळे सर्व प्रवागातील उमेदवारांचे नुकसान होणार आहे शासनाने तातडीने यासंदर्भात निर्णय घेऊन सर्व ८० टक्के पदभरती लवकरात लवकर भरावी.

**– प्रशांत शिरगुर,प्रवक्ता तथा उपाध्यक्ष**

लवकरात लवकर महाराष्ट्र राज्यामध्ये ५५ हजार शिक्षक भरती झाली पाहिजे अन्यथा सरकारच्या विरोधात पुणे येथे येणाऱ्या काळात आमरण उपोषण ला बसण्याची आमची तयारी आहे. **–कबीर जमादार,कार्याध्यक्ष**

# महेश साठे यांची सोलापूर जिल्हा नियोजन समितीवर सदस्य पदी निवड

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिफारशीने करण्यात आली नियुक्ती

पंढरपूर/प्रतिनीधी : सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना संपर्कप्रमुख महेश नाना साठे यांची सोलापूर जिल्हा नियोजन समितीवर नियुक्ती करण्यात आले आहे या नियुक्तीमुळे मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून निष्ठावंत कार्यकर्त्याला न्याय देण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना सचिव संजय मोरे यांनी १९ डिसेंबर रोजी पालकमंत्री यांना पूर्वी पाठवलेल्या पत्राची स्मरण पत्र दिले होते

त्यानुसार पालकमंत्री यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून महेश साठे जिल्हाप्रमुख चरण राज चवरे मनीषा काळज़े महेश छोटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.यापूर्वीच्या महाविकास आघाडी सरकारने महेश नाना यांची जिल्हा नियोजन सदस्य पदी निवड झाली होती पालकमंत्र्याच्या यादीत त्यांचे नाव होते नियोजन विभागाच्या यादीत देखील नाव होते पोलीस वेरिफिकेशन देखील झाले होते उपमुख्यमंत्री त्या ठिकाणी सही झाली होती परंतु मुख्यमंत्री कार्यालयातून शासन निर्णयामध्ये आणि वेळेस त्यांचे नाव कट करण्यात आले होते त्यामुळे त्यांना पाणी करण्यात आले होते एकनाथ शिंदे यांचे समर्थक असल्यामुळे त्यावेळेस त्या गोष्टी झाल्या होत्या परंतु महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी महेश नाना साठे यांच्या वरती झालेल्या अन्यायाला न्याय दिला त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे कार्यकर्त्यांना न्याय दिला जातो हे सिद्ध झाले आहे



# अ.भा.ग्रा.पत्रकार संघाचे ४ जानेवारीला एक दिवसीय अधिवेशन

## जळगाव (जामोद) येथे आयोजन, राज्यभरातील पत्रकार होणार सहभागी, अनेक मान्यवरांची राहणार उपस्थिती

जळगांव जामोद : अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे एकदिवसीय खुले राज्यस्तरीय अधिवेशन गुरुवार ४ जानेवारी २०२४ रोजी जळगाव (जामोद) येथील बऱ्हाणपूर रोडवर असलेल्या देवाशिष लॉन्स येथे आयोजित केले आहे. या अधिवेशनाचे आयोजक अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ (भारत) असुन संयोजक आम्ही जळगांवकर पत्रकार आहे.

या अधिवेशनाच्या प्रथम सत्रात सकाळी १० ते दुपारी १ वाजतापर्यंत उद्घाटन समारंभ होणार आहे. याचे उद्घाटक माजी मंत्री, आमदार डॉ. संजय कुटे यांच्या हस्ते होणार आहे. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय संवाद व माहिती तंत्रज्ञ समिती भारत सरकारचे अध्यक्ष खासदार प्रतापराव जाधव, प्रमुख उपस्थिती म्हणून खामगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार आकाश फुंडकर, राज्य पत्रकार अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष तथा दै. लोकमत मुंबईचे सहयोगी संपादक यदु जोशी, विशेष उपस्थिती म्हणून आय.एन.एस. समितीचे कार्यकारी सदस्य तथा दै. हिन्दुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे, अमरावती विभागीय अधिस्विकृती समितीचे सदस्य तथा दै. वृत्तकेसरी अमरावतीचे संपादक जयराम आहुजा आदींची उपस्थिती राहणार आहे. तर व्दितीय सत्र दुपारी २.३० वाजता ते ४ वाजतापर्यंत होणार आहे. या सत्राला प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिव डॉ. स्वाती संदिप वाकेकर, कृ.उ.बा. जळगावचे सभापती प्रसेनजीत पाटील, राजर्षी शाहु परिवार तथा संकल्पक वन बुलढाणा मिशनचे अध्यक्ष संदिप शेळके, दै. महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक, अमरावती विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष रवींद्र लाखोडे, नागपूर विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष रमेश कुळकर्णी, अमरावती विभागीय अधिस्विकृती समिती सदस्य राजेंद्र काळे बुलढाणा, सुरेंद्रकुमार आकोडे, गोपाल हरणे यांची उपस्थिती राहणार आहे.

तर समारोपीय सत्र हे दुपारी ४ ते दु. ५ वाजतापर्यंत राहणार आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी अ.भा. ग्रामीण पत्रकार संघाचे केंद्रीय अध्यक्ष मनोहर सुने राहणार असुन प्रमुख उपस्थिती म्हणून अ. भा. ग्रामीण पत्रकार संघाचे केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान यांची उपस्थिती राहणार आहे. यादरम्यान अधिस्विकृती बाबत मार्गदर्शन व आजची पत्रकारीता या विषयावर राज्य पत्रकार अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी हे मार्गदर्शन करणार आहे.

तरी या अधिवेशनाला राज्यातील सर्व पत्रकार बंधुनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने, केंद्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान, केंद्रीय महासचिव सुरेश सवळे, केंद्रीय सचिव अशोक पवार, महाराष्ट्र प्रदेश

अध्यक्ष कैलासबापू देशमुख, महिला मंच प्रदेश अध्यक्ष जयश्री पंडागडे, केंद्रीय उपध्यक्ष राजेंद्र भुरे , केंद्रीय कोषाध्यक्ष अशोक यावूल, केंद्रीय सदस्य माणिक ठाकरे, प्रदीप जोशी, केंद्रीय विधी सल्लागार ड. किरण भुते, केंद्रीय संपर्क प्रमुख प्रा. रवींद्र मेंढे, केंद्रीय सदस्य बाळासाहेब सोरगीवकर, संजय कदम , मीना राहिज, जोशीला पगारीया, वर्षा घाडगे, कांचन मुरके , भावना सरनाईक , अनुप गवळी , प्रताप मोरे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष व अ. भा. ग्रा. पत्रकार संघ, जळगाव (जामोद) तालुका कार्यकारीणी , जळगांवकर पत्रकार यांनी केले आहे. सदर अधिवेशनामध्ये राज्यभरातील पत्रकार बांधव सहभागी होणार असल्याची माहिती अ. भा. ग्रा. पत्रकार संघाचे प्रसिध्दी प्रमुख शहजाद खान व सागर सवळे यांनी दिली.

# जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यास व कला-क्रीडा हे आवश्यक

### ए.बी.मरस्कोले यांचे प्रतिपादन : मुर्री निवासी शाळेत कला व क्रीडा अविष्काराचे थाटात उद्‌घाटन




गोंदिया : माणसाने जीवन जागताना आपला विकास साधताना सर्वांगीण कार्य करणे आवश्यक आहे. शालेय जीवनात अभ्यासासह बौद्धिक तसेच क्रीडा किंवा खेळ यांच्या माध्यमातून शारीरिक शिक्षण आवश्यक आहे. तरच त्यामुळे दोन्ही कार्य म्हणजे अभ्यास व कला क्रीडा क्षेत्रात सर्वांगीण प्रगती साधावी असे प्रतिपादन गोंदियाचे तालुका क्रीडा अधिकारी ए बी मरस्कोले यांनी केले. ते अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा मुर्री येथे उद्घाटक म्हणून बोलत होते.

यावेळी मंचावर अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले, प्रमुख मार्गदर्शक सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पुजा सुरुळकर, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक ज्योती नेहे, धनंजय खराबे, दीपक देशभ्रतार सिमा सूर्यवंशी अनिल पारधी दिपक सिक्का श्री अंबादे, श्रीमती मंजुरे श्रीमती पार्थ श्री बावनकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीसूर्य ज्योतिबा फूले, राजश्री शाहू महाराज महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना माला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत रोपटे देऊन व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. सदर कला व क्रीडा अविष्कार हे अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा मुर्री येथे होत आहे. याप्रसंगी मंचावरील मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कला व क्रीडा अविष्कार या कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. यावेळी वर्ग सहावी व सातवी या विद्यार्थ्यांनी डंबेल प्रदर्शन सादरीकरण केले. मान्यवरांनी सामाने सुरू करुन दिले.

कार्यक्रमाचे संचालन शिक्षक प्रदीप ढवळे यांनी केले तसेच आभार अद्यापक मुन्नाभाई नंदागवळी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील नीता भलमे, साधना पारधी, दीक्षा तुरकर दीक्षा डाहाके, शीला तांडी श्री काळे, टी आर महाजन यांनी केले.

# ग्रामदैवत मल्लिकार्जुन मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम युद्ध पातळीवर सुरू

## आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले कामाची पाहणी



**अक्कलकोटचे ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिराच्या जिर्णोद्धरासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी शासन स्तरावरून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्यामुळे महाराष्ट्रातच एक ऐतिहासिक मंदिर होण्याचे अक्कलकोट करांचे स्वप्न पूर्ण होत आहे गर्भ ग्रह शिखर बांधकाम सभा मंडप व सुवर्ण कळसा रोहण कार्यक्रम करण्याकामी मल्लिकार्जुन भक्तांनी सढळ हाताने मदत करावे – नगरसेवक महेश हिंडोळे अक्कलकोट**

**श्रीशैल मल्लिकार्जुन मंदिराचे प्रतिबिंब असलेले अक्कलकोटचे ग्रामदैवत मल्लिकार्जुन मंदिराचे जिर्णोदरासाठी आमदार सचिन कल्याण शेट्टी यांनी शासन स्तरावरून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्यामुळेच एक ऐतिहासिक मंदिर होत असून मल्लिकार्जुन भक्तांनी मोठ्या प्रमाणात वर्गणी देऊन सहकार्य करावे असे आव्हान समाजसेवक शिवराज स्वामी अक्कलकोट**

अक्कलकोट/प्रतिनिधीः येथील ग्रामदैवत मल्लिकार्जुन मंदिराच्या बांधकामासाठी आमदार सचिन कल्याण शेट्टी यांनी महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ अंतर्गत चार कोटी रुपये मंजूर करून आणल्याने मंदिराचे जिर्णोद्धाराचे काम युद्ध पातळीवर सुरू असल्याने शहरवासीयातून समाधान व्यक्त होत आहे.

गेल्या अडीचशे वर्षाहून अधिक काळाची इतिहास सांगणारी अक्कलकोटचे ग्रामदैवत मल्लिकार्जुन मंदिरात अक्कलकोटचे आराध्य दैवत श्री स्वामी समर्थ हे सन १८५६ साली ललित पंचमीला अक्कलकोट शहरात प्रवेश केले होते त्यांनी प्रथम बस स्थानकासमोरील खंडोबा मंदिर येथे मुक्काम केले नंतर लगतच असलेल्या ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिरात जाऊन दर्शन घेतले होते. श्री स्वामी समर्थ हे सन १८५६ ते १८७८ म्हणजे २२ वर्षे अक्कलकोट शहरात वास्तव्यास होते या २२ वर्षाच्या कालावधीत वटवृक्ष देवस्थान समदे मठ गुरु मंदिर खासबाग सह तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन विविध चमत्कार करत दारिद्र्यांना दारिद्र्य मुक्त केले रोग्यांना रोगमुक्त केले होते. श्री स्वामी समर्थांचा उगम आंध्र प्रदेशातील श्रीशैलम येथे कर्दळी वनातून झाल्याचे अनेक साहित्यात ग्रंथात व बकर मध्ये उल्लेख असून श्री स्वामी समर्थांनी श्री मल्लिकार्जुनाना आपले दैवत मानत असल्यामुळे आपल्या बावीस वर्षाच्या वास्तव्य काळात दर सोमवारी न चुकता ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिरात दर्शनासाठी जात होते. अशा एका ऐतिहासिक मंदिराचे जीर्णोद्धार करण्याचे संकल्प आमदार सचिन कल्याण शेट्टी यांनी करून देवस्थान पंच कमिटीच्या सर्व सदस्यासह शहरातील नामवंत बांधवांशी सल्लामसलत करून जीर्णोद्धाराचे काम हाती घेतलेला आहे

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी प्रथम मंदिराच्या सभा मंडपासाठी महाराष्ट्र राज्य पर्यटन विभागाकडून दोन कोटी रुपये निधी मंजूर करून आणले होते मात्र मंदिर समितीचे काही सदस्यांनी सभामंडपासह गर्भ मंदिर व शिखर आधी सर्वच बांधकामाचे नूतनीकरण करण्याचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यासमोर हा विषय मांडताच शासन स्तरावरून चार कोटी रुपये निधी मंजूर करून आणले आणखी निधी लागल्यास कमी पडू देणार नसल्याचे आश्र्वासन आमदार कल्याणशेट्टी यांनी दिल्याने ग्रामदैवत मल्लिकार्जुन मंदिराचे जीर्णोद्धाराच्या कामाला जोमाने सुरुवात झाल्याने श्री मल्लिकार्जुन भक्ततातून वर्गणीची ओघ मोठ्या प्रमाणात सुरू झालेली आहे.

सदरील मंदिर जीर्णोद्धार कामासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर समितीचे शिष्टमंडळ आंध्र व कर्नाटक प्रदेशातील विविध गावांना भेटी देऊन तेथे बांधण्यात आलेल्या दगडी बांधकामाचे मंदिराचे पाहणी करून अनेक कारागराची चर्चा व सल्लामसलत करून कांचीपुरम येथील बी टेक इन टेम्पल आर्ट चे चेन्नई युनिव्हर्सिटीचे पदवी प्राप्त असलेले कांचीपुरम येथील वरदराजन आरमुखम आचार्य यांच्याकडे कामाचे जबाबदारी सोपवलेले असून विजय वाडा येथील स्टील ग्रे ग्रॅनाईट या दगडातून मंदिराचे बांधकाम करण्याचे योजले असून मंदिराचे बांधकामाला सुरुवात झालेली आहे मंदिर बांधकामासाठी आज तगायात २०० टन हून अधिक दगड मागविण्यात आलेले असून २० हून अधिक कारागिरांनी अहोरात्र दगड घडविण्याचे व नक्षीकाम करण्याचे काम माशाळे इस्टेट सोलापूर रोड येथे करण्यात येत आहे.

मंदिराचे संपूर्ण बांधकाम १८ महिन्यात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट मंदिर समितीने ठेवले असून मल्लिकार्जुन मंदिराच्या बांधकाम सेवेत सहभागी होण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्वेच्छेने वर्गणी देण्याचे आव्हान मंदिर समितीच्या वतीने करण्यात आलेल्या आहे.

मंदिर बांधकामाच्या देखभालीवर देवस्थानचे अध्यक्ष शिवलिंग स्वामी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी महेश हिंडोळे प्रशांत लोकापुरे सुनील गोरे बसवराज माशाळे शिवराज स्वामी स्वामीनाथ हिप्परगी आधी जण करीत आहेत.

# आ.कल्याणशेट्टी– तानवडेचे बावनकुळे यांच्या उपस्थितीत मनोमिलन ?

शिरवळ/हणमंत घोदे : भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या बुधवारी झालेल्या दौऱ्यात अनेक राजकीय घडामोडी पाहायला मिळाल्या आहे काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला भाजपमध्ये जाणाऱ्या अनेक इच्छुकांनी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांची भेट घेतली.यातच बावनकुळे यांनी उदय पाटील यांच्या निवासस्थानी भेट दिली. त्याठिकाणी अक्कलकोट मधील जिल्हा परिषदेचे माजी पक्षनेते आनंद तानवडे व महेश हिंडोळे यांनी प्रदेशाध्यक्षांची भेट घेऊन सन्मान केला. तिथे अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी उपस्थित होते. यावेळी तानवडे यांना आनंदराव लवकरच तुमच्यावर पक्षाकडून मोठी जबाबदारी देण्यात येणार आहे. आता अक्कलकोट मध्ये आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सोबतीने काम करा अशा सूचना बावनकुळे यांनी दिल्या आहेत.दरम्यान या प्रकरणी आनंद तानवडे यांची प्रतिक्रिया घेतली असता पक्ष देईल ती जबाबदारी आपण प्रामाणिकपणे पार पाडू आगामी लोकसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या उमेदवाराला अक्कलकोट तालुक्यातून भरघोस मते देण्यासाठी आमदार कल्याणशेट्टी यांच्या सोबतीने माझा प्रयत्न राहील.



# प्राचार्य शिवाजीराव बागल यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार प्रदान



पंढरपूर/प्रतिनिधी : अल्पावधीतच संपूर्ण महाराष्ट्र याची ग्रामीण साहित्य घरोघरी पोहोचले आणि ज्यांच्या मराठी साहित्याचा लौकिक महाराष्ट्र तसेच महाराष्ट्र बाहेर झाला तसे ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक प्राचार्य शिवाजीराव बागल यांच्या गाव खेड्यातील खेळ या बाल कादंबरीतील अखिल भारतीय शब्द मंथन समूहाचा ड्रॉ रविराज आजबे स्मृती राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे वाळवे खुर्द तालुका कागल जिल्हा कोल्हापूर येथे २४ डिसेंबर २०२३ न रोजी संपन्न झाला

# काँग्रेस महिला आघाडी तालुकाध्यक्ष शितल म्हेत्रे यांच्या उपस्थित विजय स्वामी यांच्या वाढदिवसानिमित्त दर्शनाळ शाळेत वही पेन खाऊ वाटप



दर्शनाळ/ देविदास माने: अक्कलकोट तालुक्यातील दर्शनाळ येथे श्री शिव बसव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री विजय स्वामी वाढदिवसानिमित्त काँग्रेस महिला आघाडी तालुकाध्यक्ष शितल म्हेत्रे यांच्या हस्ते जिल्हा परिषद मराठी व उर्दू शाळेमध्ये वही पेन खाऊ वाटप करण्यात आले.यावेळी ग्रामपंचायत सदस्य सौ प्रियांका माने , सौ.गौरी सराटे माजी ग्रामपंचायत सदस्य कविता स्वामी, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत जमादार,विजय व्हनमुर्गे गुंडापा जोकारे , शशिकांत व्हर्टे,शिवराज रबगले, अमोल रबगले, सोमनाथ बनसोडे, सुधाकर सराटे, संकेत माने , सचिन स्वामी, सुधाकर बिराजदार, म्हाळाप्पा गाडेकर, बाबा मामा चौधरी, अभिषेक स्वामी, राहुल सराटे, अंदाप्पा हांडगे, गणेश भोसले, पत्रकार देविदास माने, प्रशांत सराटे, नवनाथ करपे, रमेश सराटे, सुनील सराटे, पप्पू पवार, लिंबणा कोळी,संजय स्वामी, जालिंदर माने, शाहू माने, सुभाष माने, ग्रामपंचायत सदस्य आकाश माने,समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मध्यस्थीने उपोषण स्थगिती

## रेन्यू ग्रीन एनर्जी सौर ऊर्जा कंपनी विरोध उपोषण ३० दिवसासाठी स्थगिती




अक्कलकोट/प्रतिनिधी: तालुक्यातील कोन्हाळी बागेहळी हसापूर येथे रेन्यू ग्रीन एनर्जी प्रा लिमिटेड या सौर ऊर्जा कंपनीने भ्रष्ट कारभाराविरुद्ध शेतकरी बाबा सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली अमरण उपोषण आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मध्यस्थीने ३० दिवस स्थगित करण्यात आल्याची माहिती आंदोलन करते बाबासाहेब सुरवसे यांनी दिली आहे.

शासनाच्या आदेशानुसार ५० हजार रुपये दरवर्षी भाडे देणे अपेक्षित असताना शेतकऱ्यांना ३० हजार रुपये देऊन शेतकऱ्यांच्या फसवणूक केल्या बाबत बाधित शेतकरी बाबासाहेब सुरवसे यांच्यासह शंभराहुन अधिक शेतकऱ्यांनी बॅगेहळी फाट्याजवळ आमरण उपोषणास बसले होते. अखेर आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मध्यस्थीने २५ जानेवारी पर्यंत उपोषणास स्थगित देण्यात आली आहे. २५ जानेवारीच्या आत कोन्हाळी ब्यागेहली हसापूर हद्दीतील सर्व शेतकऱ्यांशी सौर ऊर्जा कंपनीने बैठक घेऊन मार्ग काढण्याचे कंपनीने आश्र्वासन दिल्याचे आमदार कल्याणशेट्टी यांनी सांगून उपोषण सोडण्याचे विनंती केल्याने आमदार सचिन कल्याण शेट्टी यांचे प्रतिनिधी नगरसेवक यशवंत धोंगडे मल्लिकार्जुन आळगी यांनी आंदोलन करते बाबासाहेब सुरवसे यांना शरबत पाजून आंदोलन सोडवण्यात आले.

# पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते श्री सिद्धेश्वर कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन

**✻ पालकमंत्री पाटील यांनी कृषी प्रदर्शनातील विविध स्टॉल्स ना भेटी देऊन पाहणी केली ✻ श्री सिद्धेश्र्वर कृषी प्रदर्शनाला जिल्ह्यातील नागरिकांनी २८ डिसेंबर २०२३ ते १ जानेवारी २०२४ या कालावधीत भेट देण्याचे आवाहन**



सोलापूर/प्रतिनिधीः श्री सिद्धेश्र्वर महा यात्रेनिमित्त कृषी विभाग व मंदिर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने होम मैदानावर सलग ५३ वे श्री सिद्धेश्र्वर कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सोलापूर जिल्ह्यासह परिसरातील नागरिकांनी– शेतकऱ्यांनी या कृषी प्रदर्शनाचा व यातील अद्यावत कृषी तंत्रज्ञानाची माहिती जाणून घेऊन त्याचा शेती मध्ये प्रत्यक्ष वापर करण्यासाठी एक चांगले व्यासपीठ उपलब्ध झालेले असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी केले.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद देवस्थान समितीचे महादेव चाकोते, बाळासाहेब भोंगडे, बसवराज शास्त्री, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, कृषी उपसंचालक राजकुमार मोरे, जिल्हा कृषी विकास अधिकारी परमेश्र्वर वाघमोडे, प्रकल्प संचालक आत्मा मदन मुकणे यांच्यासह कृषी विभागाचे विविध अधिकारी व अन्य मान्यवर उपस्थित होते. या कृषी प्रदर्शनातील विविध स्टॉल्स ना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी भेट देऊन पाहणी केली. स्टॉल वरील विविध तंत्रज्ञान व अद्यावत तंत्रज्ञाने उत्पादित शेती पिकांची माहिती त्यांनी जाणून घेतली. हे प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असल्याने जिल्ह्यातील तसेच शेजारील जिल्ह्यातील नागरिक व शेतकरी यांनी प्रदर्शनाला भेट देऊन येथील अद्यावत तंत्रज्ञानाच्या माहितीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

श्री सिध्देश्र्वर देवस्थान, सोलापूर, कषी विभाग, आत्मा व जिल्हा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ डिसेंबर २०२३ ते दिनांक १ जानेवारी २०२४ या कालावधीत या कषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या प्रदर्शनात कृषीशी संबंधित ३५० स्टॉल्स लावण्यात आलेले आहेत. यामध्ये शेतकरी उत्पादक, महिला बचतगट, कृषीशी संबंधित अद्यावत तंत्रज्ञान, कृषी अवजारे विक्रेते कंपन्या यासह विविध स्टॉल्स आहेत. सलग ५३ वर्षापासून हे कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले जात असून या प्रदर्शनास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असतो, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. गावसाने यांनी दिली.

या कृषी प्रदर्शनाला परिसरातील नागरिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ यांनी केले तर आभार प्रदर्शन कृषी उपसंचालक राजकुमार मोरे यांनी मानले.

# दिव्यांग व्यक्तींना फिरत्या वाहनावरीलदुकान मोफत उपलब्ध जिल्ह्यातील अधिकाधिक दिव्यांग व्यक्तींनीलाभ घेण्याचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधीः दिव्यांग व्यक्तींनास्वावलंबी होण्याच्या दृष्टीने हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरीलदुकान (मोबाईल शॉप ऑन ई–व्हेईकल) मोफत उपलब्ध करुन देण्याबाबतची योजना लागू करण्यासंदर्भातदि. १० जून, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. जिल्ह्यातीलगरजू दिव्यांग व्यक्तींनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र दिव्यांग वित्तव विकास महा मंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे. या योजनेचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी–सुविधाउपलब्ध करुन रोजगार निर्मितीस चालना देणे. दिव्यांग व्यक्तींचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसनकरणे. सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या परिवार, कुटुंबासमवेतजीवन जगण्यास सक्षम करणे हा आहे. या योजनेचा लाभ राज्यातील गरजू दिव्यांग व्यक्तींनामिळण्यासाठी अर्जदार नाव नोंदणी (अर्ज) करण्यासाठी दि. ३ डिसेंबर, २०२३ रोजी पोर्टलप्रक्षेपित करण्यात आले असून, दिव्यांग व्यक्तींकडून ऑनलाईन अर्ज मागविण्या साठीhttps://evehicl eform.m s hfd c.co.in ही लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या लिंकद्वारेदिव्यांग व्यक्तींनी दि. ४ जानेवारी, २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत ऑनलाईन अर्जसादर करावेत. तसेच या योजनेचा लाभ अधिकाधिक दिव्यांग व्यक्तींनी घ्यावा, असे आवाहनहीमहाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक केले आहे.